निलंबन कालावधीचा निर्णय घेणेबाबत.
श्री. अशोक दत्तात्रय लोखंडे, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र रुईछत्रपती ता पारनेर

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/अस्था-३/२४३०१६५/६६९/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश क्रं.आस्था-३/२२६/२०१४ दिनांक ०४/०३/२०१४
२. इकडील दोषारोपपत्र १ ते ४ क्र.आस्था-३/४८८/२०१४ दिनांक १९/०५/२०१४
३. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र रुईछत्रपती ता पारनेर यांचेकडील पत्र दिनांक ०९/०६/२०१४ समवेत श्री. लोखंडे यांचा खुलासा
४. इकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/७३३/२०१४ दिनांक ०२/०७/२०१४
५. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र रुईछत्रपती ता पारनेर यांचेकडील पत्र जा.क्र. आरोग्य/आस्था/२९/१४ दि ०५/०७/२०१४ समवेत श्री. लोखंडे यांचा खुलासा
६. इकडील आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/९०२/२०१४ दिनांक २३/०७/२०१४
७. इकडील पुनस्थापित करणे बाबत आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/११००/२०१४ दिनांक ०८/०८/२०१४
८. इकडील अंतिम करणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि/आस्था-३/२४३०१६५/१२४३/२०२५ दिनांक २७/१२/२०२५
९. श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत यांचा दिनांक २५/०२/२०२६ रोजीचा खुलासा
१०. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ७२ (७)(५)

श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) हे प्राथमिक आरोग्य केंद्र रुईछत्रपती ता पारनेर येथे कार्यरत असता कार्यालयीन कामकाजामध्ये गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा-सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने श्री लोखंडे यांना या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक १ च्या आदेशान्वये सेवेतुन सेवा निलंबित करणेत आलेले होते.

संदर्भ क्रमांक २ अन्वये श्री लोखंडे यांना दोषारोपपत्र १ ते ४ बजावणेत आले. सदर दोषारोपपत्राचा संदर्भ क्रमांक ३ नुसार खुलासा सादर करुन श्री लोखंडे यांनी त्यांचेवर ठेवणेत आलेले सर्व आरोप मान्य केलेने संदर्भ क्रमांक ४ नुसार कारण दाखवा नोटीस बजावणेत येऊन खुलासा सादर करणे बाबत कळविणेत आले होते. संदर्भ क्रमांक ५ अन्वये श्री लोखंडे यांनी खुलासा सादर केलेला होता. सदर खुलाशाचे अवलोकन केले असता कार्यालयीन कामी हलगर्जिपणा केलेचे सिध्द झालेने श्री लोखंडे यांचा खुलासा अंशत: मान्य करणेत येऊन संदर्भ क्रमांक ६ च्या आदेशान्वये श्री लोखंडे यांची पुढील वेतनवाढ भविष्य कालीन वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने दोन वेतनवाढ कायमस्वरुपी थोपविण्याची शिक्षा अंतिम करणेत आलेली आहे.

श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, यांचा दिनांक ०७/०३/२०१४ ते दिनांक १२/०८/२०१४ अखेर एकुण १५९ दिवस सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधीन होती.

या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ८ नुसार श्री. लोखंडे, यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावुन खुलासा मागविणेत आला होता. श्री. लोखंडे यांचा संदर्भ क्रमांक ९ नुसार खुलासा सादर केला. श्री. लोखंडे यांनी त्यांचा सेवा निलंबन कालावधी हा कामावर व्यतित केलेला कालावधी (कर्तव्य कालावधी) किंवा सदर कालावधी हा देय अनुज्ञेय रजा कालावधी म्हणून धरण्यात येवून नियमित व्हावा अशी विनंती केलेली आहे.

श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, तत्का कनिष्ठ सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र रुईछत्रपती, ता पारनेर यांचेवरील गैरवर्तनाबाबत ठेवणेत आलेले दोषारोप पहाता श्री. लोखंडें यांनी सादर केलेला खुलासा अंशत: मान्य करणेत येत येऊन संदर्भ क्र. १० मध्ये नमूद केलेल्या नियमातील तरतूदीनुसार निम्न स्वाक्षरीत नियुक्ती प्राधिकरणास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, कनिष्ठ सहाय्यक, यांचा दिनांक ०७/०३/२०१४ ते दिनांक १२/०८/२०१४ अखेर एकुण १५९ दिवस सेवा निलंबन कालावधी हा श्री. लोखंडे यांना देय अनुज्ञेय असलेल्या रजेमध्ये रुपांतरीत करण्यात यावा.

सदर आदेशाची नोंद श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, कनिष्ठ सहाय्यक, यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202607070401२5 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 07-07-2026 21:44:50

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत
द्वारा :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती कर्जत
२/- सदर आदेश संबंधितास बजावुन बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.
प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत :- निवडनस्ती.

स्वाक्षरीत /--
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर